दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा



# नवचेतना पुरस्कार २०२६

समाजासाठी समर्पित
कार्याला सलाम !

## ॥ पुरस्कार श्रेणी ॥



- आदर्श जनसेवक
- आदर्श समाजसेवक
- आदर्श उद्योजक
- आदर्श पत्रकार
- आदर्श खेळाडू
- उत्कृष्ट अधिकारी
- इतर विविध गौरव

**चला एकत्र येऊ, प्रेरणा होऊ!**

**आपल्या कार्याची दखल घेतली जाण्याची ही संधी नका गमावू!**

पुरस्कार कार्यक्रमासाठी नोंदणी सुरु;आजच आपली स्पेस बुक करा
समाजासाठी झटणारे, प्रेरणा देणारे मान्यवर यासाठी नक्की नाव नोंदवा!


**मा.श्री.प्रतिक गंगणे**
(व्यवस्थापकीय संपादक)
7276314142

**मा.श्री.लक्ष्मण साबळे**
(निवासी संपादक)
86052 84272

**मा.श्री.अभिषेक मरगळे**
(मार्केटिंग हेड)
9359421909

**मा.श्री.डॉ.विश्वासराव आरोटे**
(समूह संपादक)
9423388508

**संपर्क : ८६०५२८४२७२ / ७२७६३१४१४२**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : २४४ ● पुणे ● शुक्रवार, दि. ०८ ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




दै. आरंभ पर्वतर्फे 'नवचेतना पुरस्कार २०२५' 3



बस चालकाकडुन सामान्य नागरिकाला धमकी 4

## ठळक बातम्या

### पुणे जिल्ह्यात हिंजवडी, चाकणसह होणार तीन नवीन महापालिका!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यात चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी अशा तीन महापालिका केल्या जाणार आहेत, अशी मोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सकाळी केली. उपमुख्यमंत्री पवार शुक्रवारी सकाळी चाकण औद्योगिक क्षेत्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी चाकण औद्योगिक क्षेत्रातील नागरी समस्यांची पाहणी केली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, चाकणमध्ये नगरपरिषद असून या ठिकाणी विकासाच्या विकासावर मर्यादा येत आहेत. याच बरोबर हिंजवडीतही औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला बंधने येत आहेत. यामुळे चाकण, हिंजवडीला नवीन महापालिका केल्या जाणार आहेत. याचबरोबर उरळी देवाची-मांजरी-फुरसुंगसाठी नवीन महापालिका केली जाईल. कोणाला आवडो न आवडो या महापालिका होणारच आहेत.

### 'मनसे'साठी मविआ मैदानात

पुणे (आरंभ पर्व) : महापालिका आयुक्तांच्या कार्यालयात आयुक्त आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) पदाधिकारी यांच्यात झालेल्या वादानंतर महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) पक्ष मनसेच्या समर्थनार्थ मैदानात उतरला. मनसेसोबत महाविकास आघाडीने महापालिकेच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन केले. यामुळे पुण्यात आगामी काळात मनसे ही महाविकास आघाडीत सहभागी होऊन नवीन राजकीय समीकरण जुळणार का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. महाविकास आघाडीतील शिवसेना (ठाकरे) पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांची युती होण्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. राज्यात हिंदी सक्ती करण्याच्या निर्णयाला विरोध करत शिवसेना आणि मनसे यांच्यात दिलजमाई होणार असल्याचे बोलले जाते. शिवसेना (ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही याबाबत सकारात्मक असल्याची भूमिका मांडली आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनात मनसेबरोबर महाविकास आघाडी सहभागी झाल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क सुरू झाले आहेत.

### महापालिका प्रवेशद्वारा समोर आंदोलन

पिंपरी (आरंभ पर्व) : राज्यातील सत्तेत सहभागी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने पिंपरी-चिंचवड शहराच्या नवीन सुधारित प्रारूप विकास आराखड्याविरोधात (डीपी) जनआक्रोश मोर्चा काढल्यानंतर निवेदन स्वीकारण्यासाठी कोणताही वरिष्ठ अधिकारी न आल्याने विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. आयुक्त शेखर सिंह यांचा निषेध करून त्यांच्या वर्तनाची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचे बनसोडे यांनी सांगितले. राज्य निवडणूक आयोगाच्या बैठकीसाठी पुण्यात होतो, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# मतदाराचे मतदान प्रभागातच ठेवा

## निवडणूक आयोग; याद्यांचे विभाजन करताना काळजी घ्या

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एका प्रभागातील मतदार दुसऱ्या प्रभागात जाणार नाहीत, याची काळजी घ्या. एका मतदान केंद्रावर जास्तीत जास्त ८०० ते ९०० मतदार असतील, अशा पद्धतीने केंद्रांची रचना करा. मतदान केंद्रांवर सोयीसुविधा, आवश्यक मनुष्यबळ, उपलब्ध मतदान यंत्र आदींबाबत सूक्ष्म रितीने नियोजन करा," असे आदेश राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी गुरुवारी दिले. दरम्यान, पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतदेखील 'व्हीव्हीपॅट' नसल्याचे या बैठकीवरून स्पष्ट झाले. पुणे विभागातील पाचही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात वाघमारे यांनी आज आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. बैठकीला राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्यासह पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महापालिकांचे आयुक्त उपस्थित होते. वाघमारे म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ६५० स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुका होणार आहेत. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच निवडणुका होत आहेत. पूर्वतयारी करताना मतदार यादी, मतदान केंद्रे, मतदान यंत्रे आणि मतदार जनजागृती या चार बाबींवर विशेष लक्ष द्यावे. भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली मतदार यादीच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरली जाते. प्रभागनिहाय व केंद्रनिहाय मतदार यादीचे काळजीपूर्वक विभाजन करावे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने घेण्यात येतात. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुकीपेक्षा या निवडणुकीत मतदान केंद्रांची संख्या



वाढणार असली तरी मतदान केंद्र निश्चितीबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या निकषाद्वारे केंद्रांचे एकत्रीकरण करता येईल. सर्वसामान्य मतदार आणि दिव्यांग मतदारांसह सर्व घटकांचा विचार करून मतदान केंद्रांवर सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी."

## दै. आरंभ पर्वच्या पुणे शहर पत्रकारपदी महेश वरवटे यांची नियुक्ती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दैनिक आरंभ पर्व दैनिकाच्या पुणे शहर पत्रकारपदी श्री. महेश सुधाकर वरवटे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभव, सामाजिक भान आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोन लक्षात घेता ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

महेश वरवटे हे गेल्या काही वर्षांपासून सामाजिक विषयांवर सडेतोड आणि अभ्यासपूर्ण पत्रकारिता करत आहेत. त्यांनी अनेक महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली असून, तरुण पत्रकार म्हणून त्यांची ओळख प्रस्थापित झाली आहे.

दैनिक आरंभ पर्वने "नवचेतनेचा नवा आरंभ" या संकल्पनेतून समाजाभिमुख



पत्रकारांची निवड करत पुढाकार घेतला आहे. पुणे शहरातील घडामोडी, सामाजिक उपक्रम, समस्या आणि सकारात्मक कामांची माहिती वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्री. वरवटे यांची निवड अत्यंत योग्य असल्याचे मत संपादकीय मंडळाने व्यक्त केले आहे.

## धक्का देऊन सोनसाखळी हिसकाविली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पादचारी ज्येष्ठ नागरिकाला धक्का देऊन दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील ३० हजारांची सोनसाखळी हिसकावून नेल्याची घटना सॅलिसबरी पार्क परिसरात घडली. या प्रकरणी दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध स्वारगेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक सॅलिसबरी पार्कमधील एका सोसायटीत राहायला आहेत. या भागातील एलआयसी कॉलनी परिसरातून ते बुधवारी रात्री आठच्या सुमारास निघाले होते. त्या वेळी दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांना धक्का दिला. त्यांच्या गळ्यातील ३० हजारांची सोनसाखळी हिसकावून चोरटे भरधाव वेगात दुचाकीवरुन पसार झाले. घाबरलेल्या ज्येष्ठ नागरिकाने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले आहे. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत असून, सहायक पोलीस निरीक्षक पाटील तपास करत आहेत. शहरात गेल्या काही महिन्यांपासून पादचाऱ्यांकडील दागिने, तसेच मोबाइल संच हिसकावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. बाणेर, बालेवाडी, औंध, सिंहगड रस्ता परिसरात पादचारी महिलांकडील दागिने हिसकावून नेण्याच्या घटना घडल्या आहेत.

### वारजे भागात भरदिवसा घरफोडी

**वारजे भागात भरदिवसा सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी चार लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लांबविल्याची घटना घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे वारजे भागातील आदित्य गार्डन सिटी या गृहप्रकल्पात राहायला आहेत. ३ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास ते सदनिका बंद करून बाहेर गेले होते. चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून शयनगृहातील कपाट उचकटले. कपाटातील चार लाख ३० हजारांचे सोन्याचे दागिने लांबवून चोरटे पसार झाले.**

## निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

● **कार्याचा विशेषांक प्रकाशित**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दै. आरंभ पर्व कार्यालयात निवासी संपादक मा. श्री. लक्ष्मण साबळे यांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. यानिमित्ताने संपादक मंडळ आणि कर्मचारी परिवाराने स्नेहसंमेलन व विशेष अंक प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास मुख्य संपादिका सौ. सुरेखा सावंत-मते, व्यवस्थापकीय संपादक प्रतिक गंगणे, तसेच मार्केटिंग हेड अभिषेक मरगळे प्रमुख उपस्थित होते. कार्यालयीन सहकाऱ्यांनी आणि आमंत्रितांनी शुभेच्छांचा वर्षाव करत संपादक साबळे यांचा यथोचित सन्मान केला.

**'कार्यगौरव' विशेषांकाचे प्रकाशन** : वाढदिवसानिमित्त मा. श्री. साबळे यांच्या पत्रकारितेतील प्रदीर्घ आणि प्रेरणादायी वाटचालीचा आढावा घेणारा 'कार्यगौरव' विशेषांक सादर करण्यात आला. यामध्ये त्यांचे संपादकीय योगदान, सामाजिक काम, आणि निर्भीड पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्याचे विविध पैलू शब्दबद्ध करण्यात आले आहेत.





### स्नेहपूर्ण वातावरणात वाढदिवस साजरा

**शुभेच्छा, हास्यविनोद, आणि केक कटिंगच्या आनंददायी क्षणांत कार्यक्रम संपन्न झाला. विविध सहकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना त्यांच्याशी जोडलेले अनुभव, मार्गदर्शन व सहकार्याचे क्षण उलगडले.**

मुख्य संपादिका सौ. सुरेखा सावंत-मते यांनी विशेषांकाचे प्रकाशन करताना सांगितले, "लक्ष्मण साबळे सर यांची कार्यनिष्ठा, परखड विचार, आणि सामाजिक भान ही 'दै. आरंभ पर्व'ची खरी ताकद आहे."

कार्यक्रमाच्या अखेरीस मा. श्री. लक्ष्मण साबळे यांनी उपस्थितांचे आभार मानताना सांगितले, ""दै. आरंभ पर्व' ही केवळ एक संस्था नाही, तर एक कुटुंब आहे. इथे काम करताना मी प्रत्येक दिवशी नव्याने शिकतो आणि वाढतो आहे. हा सन्मान माझ्यासाठी पुढील कार्यासाठी ऊर्जा देणारा आहे."

'दै. आरंभ पर्व' परिवाराकडून त्यांना पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# उद्धव खरड यांचा मनसेत प्रवेश; कात्रज-आंबेगाव परिसरात पक्षाला नवी ऊर्जा

## "मनसे म्हणजे मराठी युवकांचा आवाज" : प्रमोद घुले पाटील





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राजकारणातील एक महत्त्वाची घडामोड आज पुण्यात घडली. सामाजिक कार्यात सक्रिय असलेले उद्धव खरड यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत (मनसे) अधिकृत प्रवेश केला. विशेष म्हणजे त्यांच्या पक्षप्रवेशाच्या वेळी कात्रज आणि आंबेगाव परिसरातील अनेक युवा शिलेदारांनीही प्रमोद घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली मनसेमध्ये जाहीर प्रवेश केला.

**प्रेरणा राज ठाकरे यांच्या विचारांची** : सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या स्पष्ट विचारसरणी आणि मराठी अस्मितेच्या



लढ्याने प्रेरित होऊन या तरुणांनी मनसेचा झेंडा हाती घेतला. स्थानिक पातळीवर सामाजिक कार्यात सातत्याने सक्रिय असलेले प्रमोद घुले पाटील यांनी नव्या जोशात मनसेच्या कार्याला गती देण्याचा निर्धार व्यक्त केला. हा पक्षप्रवेश सोहळा मनसे पुणे शहराध्यक्ष साईनाथ बाबर, मनविसे राज्य सचिव आशिष साबळे पाटील आणि मनविसे शहराध्यक्ष महेश भोईबार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी अमित फाटे, गणेश राठोड तसेच महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवेशानंतर बोलताना प्रमोद घुले पाटील म्हणाले, "मनसे हा केवळ राजकीय पक्ष नसून, तो मराठी युवकांचा आत्मसन्मानाचा आवाज आहे. राजसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही समाजहितासाठी झटू." या नव्या सदस्यांना लवकरच पक्षाकडून संघटनात्मक जबाबदाऱ्या सोपवल्या जाण्याची शक्यता असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत त्यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. हा पक्षप्रवेश म्हणजे मनसेच्या संघटनात्मक बळकटीचा एक नवा टप्पा ठरत असून, पुण्यातील तरुण मतदारांमध्ये नवचैतन्य निर्माण होण्याची शक्यता आहे.

### उद्धव खरड यांचे मनसेत स्वागत

**उद्धव खरड यांच्या पक्षप्रवेशाबद्दलही मनसे पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त करत सांगितले की, "खरड यांचं सामाजिक भान आणि नेतृत्वक्षमता पक्षासाठी मोलाची ठरणार आहे."**




# दुरावा साधणारे दुर्मीळ चुंबक

चुंबकाने लोखंडाचा कीस उचलण्याचा प्रयोग विद्यार्थ्यांनी शाळेत केलेला असतो. परंतु चुंबक हे सामरिक डावपेचांमध्ये आपल्या प्रतिस्पर्धी राष्ट्रांना दूर ठेवण्यासाठीचे शस्त्र म्हणूनही उपयोगात येऊ शकते.

चीनने सध्या तेच चालविले असून दुर्मीळ खनिजांपासून तयार होणाऱ्या चुंबकावर व्यापार-उदिमात इतर राष्ट्रांची प्रगती ते रोखत आहेत. विजेवर चालणाऱ्या मोटारींच्या बॅटरीची मदार या दुर्मीळ खनिजांपासून तयार होणाऱ्या चुंबकावर आहे. संख्येमध्ये किंवा वजनामध्ये त्यांचे प्रमाण खूप मोठे नाही, परंतु ते म्हणजे या ईव्ही मोटारींचे हृदय आहे. त्यामुळे बसगाड्यांपासून मोटारी-दुचाक्यांपर्यंतच्या उत्पादनास खीळ तर बसू शकतेच; त्याचबरोबर सामरिक उपयोगाच्या इतरही अनेक साधनांची उत्पादन साखळी कोलमडण्याचा धोका असतो.

रसायनांच्या सारिणीतील १७ रसायन मूलद्रव्यांच्या समूहात ही दुर्मीळ खनिजे मोडतात. गॅडोलिनिमिअम, निओडायमिअम, सेरिअम, डिस्पोजिअम, प्रॅसिओडायमिअम, युरोपिअम, टर्बिअम, वायट्रीअम अशी मूलद्रव्यांची कठीण नावे आहेत. यातल्या एकेक घटकाचे आधुनिक युगातील साधनांच्या निर्मितीत मोलाचे स्थान आहे. विजेवरच्या वाहनांमधील मोटर्स, ड्रोन्स, क्षेपणास्त्रे, रडार, पवनऊर्जेची मोटर, जेट इंजिनांची कार्यक्षमता वृद्धी, तरुणांच्या कानांत दिसणारी श्रवणयंत्रे, एलईडी, कॅमेऱ्याच्या लेन्स, वैद्यकीय वापरातील मोजमापाची उपकरणे अशा विविध साधनांचा ही खनिजे म्हणजे कणा आहे. दुर्मीळ खनिजांपासून तयार होणारे चुंबक हे ऊर्जाबचत तर करतातच, शिवाय वजन व



आकार यातही सरस असतात. काही महिन्यांपूर्वी सेमीकंडक्टर निर्मितीवरून बरेच वादळ उठले होते.

भारतात काही वर्षांपूर्वी पंजाबात एक सेमीकंडक्टरचा प्रकल्प आला होता, मात्र त्यात आग लागल्यावर पुढे काही त्यावर झाले नाही, याबद्दल वाहन उद्योगातील तंत्रज्ञाने खंत व्यक्त केली. अजून पुढची दहाएक वर्षे तरी भारताकडे ठोस तोडगा दृष्टिपथात नाही. जपानने पर्याय शोधून आपले चीनवरचे अवलंबित्त्व कमी केल्याचे सांगितले जाते. भारताने आता अरबी समुद्र व बंगालच्या उपसागरात समुद्रतळाशी खनिजांचे उत्खनन करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या समुद्री कायदा मंचापुढे (अन्क्लॉस) परवानगी मागितली आहे. दोन वर्षांपूर्वी सतलजच्या खोऱ्यात टॅन्टॅलम या दुर्मीळ धातूचा स्रोत सापडला आहे.

यावरून, १५-२० वर्षांपूर्वी लोह खनिजांसाठी गोवा व पश्चिम घाटामध्ये बेसुमार उत्खनन सुरू होते, तेव्हाची आठवण झाली. त्या वेळी न्या. एम. बी. शाह यांच्या नेतृत्त्वाखाली एक समिती नेण्यात आली होती. लोह खनिजाची ५० वर्षांची गरज लक्षात घेऊन त्यानुसार आपण नियोजन व संवर्धन करण्याची आवश्यकता आहे, अशी शिफारस त्यांनी केली होती. आपल्या देशातील पायाभूत सुविधा उभारणीसाठी चीन मोठ्या प्रमाणात लोह खनिज खरेदी करत सुटला होता. यावरूनच आता खरा महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो.

नैसर्गिक साधनस्रोतांचे दूरगामी व्यवस्थापन आपण किती काटेकोरपणे करतो आहोत, हा तो प्रश्न. एके काळी क्रूड तेलाभोवतीच जगातील भूराजकीय डावपेच फिरत होते.

अमेरिकेने छेडलेली युद्धे हा त्याचाच परिपाक. आत्ताही अमेरिकेने आयातशुल्काच्या रूपाने व्यापारयुद्ध छेडले आहे. तर चीन हा खनिजे आपल्याकडे राखून उद्योगाच्या पुरवठा साखळीला छेद देऊ पाहत आहे. हे सर्व आपल्याला आधी सुचले नव्हते का, हा प्रश्न मनात येऊ शकतो. परंतु प्रत्येक देशाची जडणघडण व जनतेचा उदरनिर्वाह, लोकजीवन, नैसर्गिक अन्नसाखळी, या सर्वांशी हा प्रश्न निगडित असतो.

खनिज सापडले म्हणून वसुंधरेवर अत्याचार करून लोकांचे विस्थापन आपण करू शकत नाही. वन्यजीव, सजीवसृष्टी, जंगल आच्छादन यावर बेसुमार कुऱ्हाड चालवू शकत नाही. समुद्रतळ कितीही पोखरले, तरी त्याचा जलजीवनावर किती परिणाम होईल, त्याचेही मोजमाप आवश्यक ठरते. वाहन क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणतात, त्यानुसार भविष्यकाळातील मोटार इंधन हे हायड्रोजन असेल, तर हे सगळे आडाखे बदलूही शकतात. या दूरदृष्टीनुसार नैसर्गिक साधनस्रोतांचे व्यवस्थापन नितांत गरजेचे आहे.

# केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवाव्यात : प्रमोद कापसे

## भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत केळी पिकाचा समावेश करण्याची मागणी

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजितदादा पवार यांना सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सरचिटणीस प्रमोद सुरेश कापसे यांनी केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणींबाबत निवेदन सादर केले. या निवेदनात भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत केळी पिकाचा समावेश करण्याची





मागणी त्यांनी केली आहे.

सध्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ५ एकरपर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्यांना केळी लागवडीसाठी दोन वर्षांसाठी प्रति एकर ८०,००० रुपये अनुदान मिळते. मात्र, ५ एकरांपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी लागू असलेल्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत केळी पिकाचा समावेश नसल्यामुळे मोठ्या क्षेत्रावर केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळत नाही. ही बाब अन्यायकारक असून, तातडीने सुधारणा करून भाऊसाहेब फुंडकर योजनेत केळी पिकाचा समावेश करावा, अशी जोरदार मागणी कापसे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनाची प्रत त्यांनी नूतन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनाही दिली आहे.

सोलापूर जिल्ह्यात केळी लागवडीचे क्षेत्र वेगाने वाढत असून, त्यातून मोठ्या प्रमाणात उत्पादन व निर्यात होते. त्यामुळे माळशिरस येथे केळी संशोधन केंद्र, प्रक्रिया उद्योग, पॅक हाऊस व कोल्ड स्टोरेज आदींसाठी विशेष पॅकेज देण्यात यावे, अशी विनंतीही त्यांनी केली आहे.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी लवकरच यावरून मीटिंग घेऊन निर्णय घेण्यात येईल असे सांगितले..

## खेड तालुक्यातील अपहरण व मारहाण प्रकरणात नवे वळण

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील खरपूडी बुद्रुक येथील चर्चित अपहरण प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. या प्रकरणातील संशयीत आरोपी आई व भाऊ यांना न्यायालयाने दोन दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर या प्रकरणाबाबत मुलीचे वडील राजाराम काशिद यांनी अपहरण प्रकरणातील फिर्यादी विश्वनाथ गोसावी यांच्यावर गंभीर आरोप केले आहे. राजाराम काशीद यांनी आपल्या कुटुंबावरील सर्व आरोप फेटाळून लावत गोसावी यांच्यावर फसवणुकीचा आणि कायद्याचा भंग

- **विवाहितेच्या वडीलांचे मठावर व गोसावीवर गंभीर आरोप**

केल्याचा ठपका ठेवला आहे. राजाराम काशीद यांनी सांगितले की, विश्वनाथ गोसावी हा कोणताही महाराज नसून, मांडवळा- खरपूडी येथे मठाच्या नावाखाली अनेक गैरप्रकार चालवत आहे. त्यांचे अनेक चुकीचे व्यवसाय तालुक्याबाहेरही सुरू असून, पैशांच्या जोरावर ते काहीही करू शकतात, असा गंभीर आरोप काशीद यांनी केला.

## पालिकेकडून धायरी परिसरातील स्वच्छतागृहांची, साफसफाई दुरुस्ती

### बापूसाहेब पोकळे यांनी केली होती मागणी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धारेश्वर मंदिर परिसरातील सार्वजनिक स्वच्छतागृह आणि शौचालयांची अवस्था अत्यंत खराब झाली होती. यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.

ही गंभीर समस्या लक्षात घेऊन स्थानिक सामाजिक कार्यकर्ते तसेच खडकवासला विधानसभा भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे पाटील यांनी पुणे महानगरपालिकेकडे



तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती.

पोकळे यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत महापालिकेने त्वरीत कारवाई केली. धारेश्वर मंदिर परिसरातील स्वच्छतागृह, सार्वजनिक शौचालय तसेच धायरी ब्रिज शौचालयाची स्वच्छता व दुरुस्ती करण्यात आली.

याशिवाय परिसरात वाढलेले गवतही काढण्यात आले. यावेळी निरीक्षक निसार शेख यांनी पुढे जाऊन आठवड्यातून एक दिवस या स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता केली जाईल, असा शब्द दिला. या त्वरित कारवाईमुळे परिसरातील नागरिकांत समाधानाची लाट असून, स्थानिक स्वच्छता आणि सुविधा सुधारण्यात यश आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

## 'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले गगनभरारी यश कौतुकास्पद

- **प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन**
- **सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना १०० टक्के इंटर्नशिप व प्लेसमेंट**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझमच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर १०० टक्के इंटर्नशिप व प्लेसमेंट मिळवण्याची परंपरा यंदाही कायम राखली आहे. देश-विदेशातील पंचतारांकित, सप्ततारांकित हॉटेल्स व अन्य आस्थापनांमध्ये इंटर्नशिप व प्लेसमेंट




मिळवत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांची ही उल्लेखनीय कामगिरी सूर्यदत्त संस्थेसाठी कौतुकास्पद व अभिमानस्पद असल्याची भावना सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केली.

'सूर्यदत्त'च्या विद्यार्थ्यांनी गुणवत्तेच्या जोरावर प्रतिष्ठित हॉटेल्समध्ये उल्लेखनीय कामगिरी साधली आहे. कुणाल अमर चौरे, हर्षल अशोक गायकवाड व अनुराग पार्की यांची न्यूझीलंडच्या कॉर्डिस हॉटेल्समध्ये, तर अमेय अनिल पापळ, अविष्कार संतोष वाबळे यांची मॉरिशस येथील सीपॉईंट बुटीक हॉटेल येथे इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. पुण्यातील द वेस्टिन, कोरेगाव पार्क येथे ओंकार मिरगुंदे, साईराज बालवडकर, संदीप लोंढे, प्रतीक सोनवणे, संग्राम गंजे व प्रदीप लगड यांना, तर द रिट्झ कार्लटनमध्ये निनाद फडके व अर्जुन नाम्बियार यांना संधी मिळाली आहे. मुंबईतील ट्रायडेंट बीकेसी येथे अविष्कार वाबळे, जे. डब्ल्यू. मॅरियट सहार मध्ये पायल धनवे, मेरिएट जयपूर येथे श्रद्धा चव्हाण यांनी इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. इतर विद्यार्थ्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित हॉटेलांमध्ये इंटर्नशिप, प्लेसमेंट मिळाली आहे. याआधीही सिंगापूर, मलेशिया, मॉरिशस, अमेरिका, न्यूझीलंड यासह इतर अनेक देशांत 'सूर्यदत्त'चे विद्यार्थी या क्षेत्रात उत्तम काम करत आहेत. मॉरिशसमधील शांग्रीला हॉटेल, जर्मनीतील रिटलबर्ग हॉटेल, मलेशियातील हिल्टन, चीनमधील इंडियन किचन स्पाईसेस लिमिटेड, सिंगापूरमधील द रिजंट, अमेरिकेतील हॉलिडे इन, फ्लोरिडामधील रिनाइसन्स, पटायातील सन सिटी, सिंगापूरमधील मेरियट यांसारख्या पंचतारांकित हॉटेल्स मध्ये 'सूर्यदत्त'चे विद्यार्थी वरिष्ठ पदांवर कार्यरत आहेत. तसेच अनेकांनी आपला स्वतःचा व्यवसायही सुरु केला आहे.



## रक्षाबंधनचा कार्यक्रम सोहळा संपन्न

**डोंबिवली (दै. आरंभ पर्व)**

रक्षाबंधनाच्या शुभ प्रसंगी, डोंबिवली सेवा केंद्राने प्रेम आणि स्नेह भेटीचा कार्यक्रम आयोजित केला होता. देवाच्या स्मरणाने या कार्यक्रमाची सुरुवात केली. मनीषा बेन यांनी संस्थेची थोडक्यात ओळख करून दिली. त्यानंतर कलावती बेनने रक्षाबंधनाचे आध्यात्मिक महत्त्व स्पष्ट केले आणि उमा बेनने शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिक्षणमहर्षी केशव भोईर, महादेव ढोकले सर समुपदेशक (ढोकले वर्ग) गांवदेवी शाळेचे प्राथमिक मुख्याध्यापक, घावट सर, निरंजन कदम, मुंब्रेश्वर मंदिराचे विश्वस्त निखिल शासन, नृत्य चिकित्सा प्रशिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी, सर्व भाऊ-बहिणींनी देवाच्या घराची राखी बांधली आणि सर्वांना शंक आणि आशीर्वाद कार्ड दिले.

# महापालिका आयुक्तांना विविध आंबेडकरी संघटनांचा पाठिंबा

## अधिकाऱ्यांवरील अरेरावी व दादागिरीमुळे राजकीय कार्यकर्त्यांची बदनामी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना आंबेडकरी चळवळीत कार्यरत विविध पक्ष, संघटनांचे प्रतिनिधी व आजी-माजी नगरसेवक यांनी भेट घेऊन ठाम पाठिंबा जाहीर केला. यावेळी शिष्टमंडळाने आयुक्तांशी सविस्तर चर्चा करून त्यांच्या कार्यशैलीचे समर्थन केले आणि पुणेकर नागरिक त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

गेल्या काही दिवसांपूर्वी मनसे पदाधिकाऱ्यांनी आयुक्तांच्या बैठकीमध्ये घुसून गोंधळ घातल्याच्या घटनेमुळे निर्माण झालेल्या



पार्श्वभूमीवर ही भेट घेण्यात आली. या घटनेचा निषेध करताना प्रतिनिधींनी म्हटले की, लोकप्रतिनिधी म्हणवून घेत कार्यकर्त्यांकडून बैठकीत धुडगूस घालणे हे अत्यंत लाजीरवाणे आहे आणि यामुळे प्रामाणिक कार्यकर्त्यांची अनावश्यक बदनामी होत आहे.

शिष्टमंडळात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर, माजी नगरसेवक अविनाश साळवे, रोहिदास गायकवाड, शैलेंद्र चव्हाण, राहुल डंबाळे, असित गांगुर्डे, युवराज बनसोडे, माजी उपमहापौर सुनिता वाडेकर, हिमाली कांबळे, निलेश आल्हाट आणि आंबेडकरी चळवळीतील इतर नेते सहभागी होते.

शिष्टमंडळाने यावेळी नमूद केले की, नवल किशोर राम हे प्रशासनात दीर्घ अनुभव असलेले अधिकारी असून त्यांनी बीड, छत्रपती संभाजीनगर व पुणे जिल्ह्यात यशस्वी कारभार केला आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी कोविड काळात केलेले कार्य व भीमा कोरेगावच्या दंगलीच्या वेळी दाखवलेले नेतृत्व पुणेकर विसरलेले नाहीत. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे चुकीचे आहे. मनसेकडून झालेल्या प्रकारानंतर त्याला 'मराठी-अमराठी' वादाचा रंग देण्याचा प्रयत्न अत्यंत हास्यास्पद असल्याचे मतही शिष्टमंडळाने व्यक्त केले. आयुक्त राम हे उत्तम मराठी बोलतात व मराठी वाचक आहेत. ते अनेक वर्षांपासून स्थानिक कार्यकर्त्यांशी मराठीतून संवाद साधत आले आहेत. त्यामुळे भाषेच्या मुद्द्यावरून वाद निर्माण करणे म्हणजे मूळ विषयापासून लक्ष हटवण्याचा केविलवाणा प्रयत्न असल्याची टीका करण्यात आली.

या प्रकारात महाविकास आघाडीचे काही घटक मनसेच्या भूमिकेला समर्थन देत असल्याचे दिसल्याने आश्चर्य व्यक्त करत, अशा स्टंटबाजीला पाठिंबा देणे दुर्दैवी असल्याचेही शिष्टमंडळाने सांगितले.

"पुणेकर नागरिक महापालिका आयुक्तांच्या कार्यशैलीवर विश्वास ठेवतात व भविष्यातही ते त्यांच्या सोबत राहतील," असा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला. या घटनेचा अतिरिक्त आयुक्त मा. पृथ्वीराज यांच्या कडे तीव्र शब्दात निषेध करण्यात आला.

# थोडक्यात



## शिक्षक सक्षमीकरणासाठी 'साधना फेलोशिप' उपक्रम

पुणे (आरंभ पर्व) : शिक्षण व्यवस्था बळकट करण्यासाठी पुण्यातील स्वयंसेवी संस्था 'लीडरशिप फॉर इक्विटी' (एलएफई) आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या (टीआयएसएस) सेंटर ऑफ एक्सलन्स इन टीचर एज्युकेशन आणि बजाज फिनसर्व्ह यांच्या संयुक्त विद्यमाने 'साधना फेलोशिप २०२५' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सहा महिन्यांचा हा प्रशिक्षण उपक्रम येत्या सप्टेंबरपासून कार्यान्वित होणार असून, शिक्षणात रुची असलेल्या युवकांना प्रत्यक्ष अनुभव देत त्यांना आत्मनिर्भर आणि सक्षम शिक्षक घडवण्याचा उद्देश यामागे आहे, अशी माहिती 'एलएफई'चे सहसंस्थापक सिद्धेश शर्मा यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी 'एलएफई'च्या प्रकल्प व्यवस्थापक काजल पवार, अकॅडमिक लीडर शार्दुली जोशी आदी उपस्थित होते.

## गोठ्याला आग; सहा जनावरे जखमी; शेतकऱ्याचे चार लाखांचे नुकसान

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : खरपूड (ता. खेड) येथे मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास जनावरांच्या गोठ्याला लागलेल्या आगीत चार दुभत्या म्हशी आणि दोन बैल जखमी झाले. भीमाशंकर अभयारण्य परिसरातील गावकुसाबाहेरील वस्तीत हा प्रकार घडला. या दुर्घटनेत शेतकरी देवराम तुकाराम मदगे यांचे सुमारे चार लाख रुपयांचे नुकसान झाले. नेहमीप्रमाणे रात्री नऊ वाजता देवराम मदगे यांनी गोठ्यातील म्हशींचे दूध काढून त्यांना चारा टाकला आणि कुटुंबासह झोपी गेले. मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास जनावरे ओरडण्याचा आवाज आणि बाहेर मोठा उजेड दिसल्याने दशरथ मदगे यांनी बाहेर पाहिले असता गोठ्याला आग लागल्याचे दिसले. त्यांनी आरडाओरड करताच गावातील ग्रामस्थांनी धाव घेतली. शर्थीचे प्रयत्न करून आगीच्या वेढ्यातून चार म्हशी आणि दोन बैलांना बाहेर काढले; मात्र, यापैकी दोन म्हशी ८० टक्के, तर दोन बैल आणि दोन म्हशी ५० टक्के भाजल्या गेल्या. यामध्ये एक गाभण आणि एक दुभती म्हैस असल्याने त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती पोलिस पाटील संगीता भोकटे यांनी महसूल विभागाला कळविली. सरपंच तानाजी भोकटे आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत तलाठी संगीता जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आणि घटनेचा अहवाल खेड तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्याकडे सादर केला. जखमी जनावरांवर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. नवनाथ राठोड, डॉ. वेदांत ओव्हाळ आणि डॉ. देवेंद्र ओव्हाळ यांनी औषधोपचार केले. ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे जनावरांचा जीव वाचला असला, तरी शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.



## द्राक्ष बागायदारांच्या समस्यांसाठी त्वरित उपाययोजना करा : प्रमोद कापसे

सोलापूर (आरंभ पर्व) : सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सरचिटणीस व कृषी पदवीधर संघटक प्रमोद सुरेश कापसे यांनी राज्याचे नूतन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना द्राक्ष बागायतदारांच्या समस्या मांडत विशेष निवेदन सादर केले आहे. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून शासन स्तरावरून तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, असे प्रमोद कापसे यांनी निवेदनात नमूद केले आहे. प्रमोद कापसे यांनी यावेळी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील हजारो द्राक्ष उत्पादक शेतकरी शासनाच्या धोरणामुळे आर्थिक संकटात सापडले आहेत. आयातीत द्राक्षांमुळे स्थानिक बाजारपेठ कोसळत असून, शेतकऱ्यांचे नुकसान वाढत आहे. यावर त्वरित निर्णय घेऊन योग्य उपाययोजना केल्यास द्राक्ष बागायतदारांना मोठा दिलासा मिळेल. कापसे यांनी दिलेल्या निवेदनावर बैठक बोलावून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन यावेळी कृषी मंत्री भरणे यांनी दिले.

# थोडक्यात



## होंड बिगविंग पुणे ईस्टच्या वतीने सीबीयू गाड्यांचे लॉन्चिंग व वितरण

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील सुप्रसिद्ध होंडा कंपनीने आपल्या प्रीमियम श्रेणीतील मोटारसायकलींच्या नवीन सीबीयू (CBU Completely Built Units) मॉडेल्सचे पुण्यात ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय जवळील बिग विंग होंडाच्या अधिकृत शोरूममध्ये भव्य लॉन्चिंग केले. तसेच खरेदी करण्यात आलेल्या ग्राहकांना त्या सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी खास ऑफर्सही जाहीर करण्यात आल्या. प्रत्येक बाईकची वैशिष्ट्ये थेट सादरीकरणाद्वारे उपस्थितांना दाखवण्यात आली. यावेळी कंपनीने 'X - ADV 750', 'CBR 650R' आणि 'CB 650R' या तीन नव्या मॉडेल्स सादर केल्या. हे सर्व मॉडेल्स जागतिक दर्जाचे असून भारतीय रस्त्यांवर नव्या उमेदीने धावणार आहेत. तसेच त्या आकर्षक गाड्यांमुळे भारतीय तरुणाई फारच उत्साहाने गाड्या खरेदी करेल, असा तर्क सांगितला जात आहे.

## प्रशांत सुरसे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रदेश सचिवपदी नियुक्ती



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : हडपसर परिसरात कार्यरत असलेले काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रात सक्रीय योगदान देणारे प्रशांत सुरसे यांची प्रदेश काँग्रेस कमिटीच्या प्रदेश सचिवपदी निवड करण्यात आली आहे. प्रशांत सुरसे हे गेल्या २५ वर्षांपासून समाजकारण व राजकारणात सक्रिय असून, त्यांनी काँग्रेस प्रणित विद्यार्थी संघटना NSUI च्या सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश सहसचिव, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष, युवक काँग्रेस शहर उपाध्यक्ष, पुणे शहर काँग्रेस कमिटीचे सचिव, काँग्रेस ओबीसी विभाग पुणे शहराध्यक्ष, तसेच येरवडा मध्यवर्ती कारागृह समिती सदस्य म्हणून जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांमध्येमध्ये लोकप्रिय असलेले प्रचंड जनसंपर्क असलेले, हडपसर मतदारसंघातील सामाजिक प्रश्नांवर सातत्याने लढणारे कार्यकर्ते म्हणून सुरसे यांचा परिचय आहे.

# दै. आरंभ पर्वतर्फे 'नवचेतना पुरस्कार २०२५'

## समाजासाठी समर्पित कार्याचा भव्य सन्मान सोहळा : "समाजासाठी समर्पित कार्याला सलाम!"




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी दैनिक आरंभ पर्वतर्फे आयोजित करण्यात आलेला 'नवचेतना पुरस्कार २०२८' यंदा अधिक भव्य आणि प्रेरणादायी स्वरूपात साजरा होणार आहे. १२ ऑक्टोबर २०२५ रोजी हा प्रतिष्ठेचा सोहळा संपन्न होणार असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना या मंचावर गौरवण्यात येणार आहे.

"समाजासाठी समर्पित कार्याला सलाम" या भावनेतून प्रेरणा घेत आरंभ पर्वने समाजाच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान आणि समर्पित व्यक्तींचा शोध सुरू केला आहे. या पुरस्काराचा उद्देश म्हणजे समाजसेवा, जनसेवा, उद्योजकता, पत्रकारिता, क्रीडा, प्रशासन अशा क्षेत्रांतील कार्यकर्त्यांना गौरवून नव्या पिढीला प्रेरणा देणे.

"चला एकत्र येऊ, प्रेरणा होऊ!" या संकल्पनेतून कार्यक्रमासाठी नोंदणी प्रक्रेलाही सुरूवात झाली आहे. समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व्यक्तींनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन दैनिक आरंभ पर्वच्या वतीने करण्यात आले आहे.

"आपल्या कार्याची दखल घेतली जाण्याची ही संधी नका गमावू!" आपली स्पेस आजच बुक करा आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तींपर्यंत हे आवाहन पोहोचवा.

**● पुरस्कार श्रेण्या ●**

- आदर्श जनसेवक
- आदर्श समाजसेवक
- आदर्श उद्योजक
- आदर्श पत्रकार
- आदर्श खेळाडू
- उत्कृष्ट अधिकारी
- इतर विविध गौरव

**नोंदणी प्रक्रिया सुरू**

### नाव नोंदणीसाठी संपर्क

- मा. श्री. प्रतिक गंगणे (व्यवस्थापकीय संपादक): 7276314142
- मा. श्री. अभिषेक मरगळे (मार्केटिंग हेड): 9359421909
- मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक): 8605284272
- मा. श्री. डॉ. विश्वासराव आरोटे (समूह संपादक): 9423388508
- मा. श्री. महेश सुधाकर वरवटे (पुणे शहर पत्रकार): 8378809363

**सोहळ्याची माहिती : पुरस्कार वितरण सोहळा: १२ ऑक्टोबर २०२५ स्थळ व वेळ: लवकरच जाहीर होणार**

# सातव्या वेतन आयोगाचा फरक लवकरच मिळणार!



- **सचिन दांगट यांचे आयुक्तांना निवेदन**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ (PMPML) मधील हजारो कामगार गेल्या अनेक महिन्यांपासून सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या दुसऱ्या हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. कामगारांचे हक्क आणि न्यायासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. या मुद्द्यावर शासन-नियुक्त ३४ गावे समितीचे सदस्य व स्वीकृत नगरसेवक मा. सचिनभाऊ दांगट व जनसेवक, कामगार नेते मा. गणेश गवांडे यांनी पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. नवल किशोर राम यांची भेट घेऊन चर्चा केली. PMPML कामगारांना सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता ऑक्टोबर 2024 मध्ये मिळाला होता. मात्र दुसरा हप्ता मिळण्यात सहा महिन्यांपेक्षा अधिक उशीर झाल्यामुळे कामगारांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. या भेटीत कामगारांच्या आर्थिक अडचणी, कुटुंबीयांचे प्रश्न, वाढती महागाई आणि अन्य सामाजिक बाबी मांडत, वेतन फरकाचा उर्वरित हप्ता तातडीने देण्याची मागणी करण्यात आली. आयुक्तांनी या विषयावर सकारात्मक भूमिका घेत, लवकरात लवकर फरक देण्याचे स्पष्ट आश्वासन दिले. ही भेट PMPML कामगारांच्या संघर्षात एक महत्त्वाचा टप्पा ठरली असून, हजारो कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना दिलासा मिळणार आहे. लवकरच फरकाचा हप्ता खात्यावर जमा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## सेवा भारती कात्रज-पर्वती तर्फे आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेवा भारती कात्रज व पर्वती विभाग यांच्या वतीने ३ ऑगस्ट रोजी वि.स. खांडेकर शाळा येथे 'आपत्ती व्यवस्थापन' विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

प्रशिक्षणात श्री. राहुल पोखरकर (जिल्हाधिकारी कार्यालय), नागरी संरक्षण दलाचे श्री. श्रीकृष्ण पाटील व श्री. प्रमोद मोरे यांनी मार्गदर्शन केले.



कार्यशाळेत CPR, प्रथमोपचार, आणि आगीच्या घटनांतील खबरदारी यावर प्रात्यक्षिक व माहिती देण्यात आली. यावेळी देशसेवा फाउंडेशनचे चे नरेंद्र शंकर पारखे उपस्थित होते. त्यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून सेवा भारतीच्या उपक्रमाचे स्वागत केले. सेवा भारतीचे प. महाराष्ट्र सचिव श्री. प्रदीप सबनीस, सहसचिव श्री. अविनाश नाईक व अध्यक्ष श्री. मुकुंदराव दरेकर यांच्यासह कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निविदा नोटीस

खालील कामाची सिलबंद निविदा ग्रामपंचायत वरुडे, ता.खेड, जि.पुणे हे जिल्हा परिषद पुणे यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रा.पं. वरुडे, ता. खेड, जि. पुणे यांजकडून दि. ०८/०८/२०२५ ते १४/०८/२०२५ पर्यंत दुपारी ०४ :३० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठविलेल्या मोहोरबंद निविदा दि. ०८/०८/२०२५ ते १४/०८/२०२५ पर्यंत ग्रामपंचायत वरुडे, ता. खेड, जि. पुणे मध्ये स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास दि. १८/०८/२०२५ रोजी सायं. ०५:०० वा. अथवा लगतच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | वरूडे येथील शासकीय इमारती दुरूस्ती करणे/पी.एच.सी. सेंटर दुरूस्ती करणे. | ३:०० लक्ष | १००/- | ३ महिने |

नियम व अटी : १)नोंदणीकृत शासकीय प्रमाणपत्र, जी.एस.टी प्रमाणपत्र, पॅनकार्ड सर्टीफीकेट, इसारा रक्कम, निविदा फी, डिमांड ड्राप्ट ठेकेदाराने सिलबंद पाकीटात द्यावेत.२) काम केल्याचा अनुभव दाखला ठेकेदाराने निविदेसोबत जोडावा.३) कोणतीही निविदा कारण न देता फेटाळण्याचा हक्क ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत वरूडे, ता. खेड, जि. पुणे

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत वरूडे, ता. खेड, जि. पुणे

# ज्ञानेश्वर रावसाहेब लबडे यांचा शोध अद्यापही अपुरा

## महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे शिवाभाऊ पासलकर यांची माहिती




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोलापूर जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील शेटफळ नाका येथून ज्ञानेश्वर रावसाहेब लबडे (वय ३७ वर्षे) हे दि. ९ जुलै २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता अचानकपणे घरातून बाहेर गेले आणि त्यानंतर आजपर्यंत त्यांचा कुठलाही ठावठिकाणा लागलेला नाही. दोन वर्षांचा कालावधी उलटूनही ते कोठे आहेत याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही, यामुळे त्यांचे कुटुंबीय अत्यंत चिंतेत असून भावनिकदृष्ट्याही खचलेले आहेत. या प्रकरणाची माहिती महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे संस्थापक शिवाभाऊ पासलकर यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. त्यांनी सांगितले की, "ज्ञानेश्वर लबडे यांचा शोध घेण्याचे सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले असून, पोलिसांकडूनही विचारणा करण्यात आली आहे. मात्र, अद्याप त्यांचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही. त्यामुळे समाजातील जागरूक नागरिकांनी या प्रकरणात मदत करावी, अशी विनंती आहे." या पत्रकार परिषदेला ज्ञानेश्वर लबडे यांचे आई-वडील, बहीण, मुलगी, चुलत भाऊ, मेव्हणे आणि इतर नातेवाईक देखील उपस्थित होते. सर्वांनी मिळून भावनिक आवाजात आपले दु:ख मांडले आणि सार्वजनिक माध्यमांद्वारे व समाजाच्या सहकार्याने त्यांच्या शोधाला चालना मिळावी अशी विनंती केली.

***बेपत्ता व्यक्तीची माहिती :***
***नाव: ज्ञानेश्वर रावसाहेब लबडे***
***वय: ३७ वर्षे***
***बेपत्ता झाल्याची तारीख: ९ जुलै २०२३***
***स्थळ: मु.पो. शेटफळ नाका, ता. करमाळा, जि. सोलापूर***
***सकाळी ९.३० वाजता घरातून बाहेर पडताना***
***संपर्कासाठी मोबाईल क्रमांक: शिवाभाऊ पासलकर – (93264 25858)***

सामाजिक जबाबदारी म्हणून, कोणीही वरील व्यक्तीला कुठेही पाहिले असल्यास कृपया त्वरित संपर्क साधावा. आपली एक छोटीशी मदत एका कुटुंबाला मोठा दिलासा देऊ शकते.

# ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे.

## मौजे चऱ्होली खुर्द येथे कामाची निविदा सूचना (निविदा नोटीस सन - २०२५/२०२६)

वरील विषयास अनुसरून खालील कामांचे सीलबंद निविदा ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे. हे जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम व योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून (दोन पाकीट पद्धतीने) मागवीत आहे. ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे यांजकडून दि. ०८/०८/२०२५ ते २२/०८/२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ०५.३० पर्यंत जमा करून घेण्यात येतील व भरून प्राप्त झालेल्या मोहोरबंद निविदा दि. २२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ०५.४५ वाजता किंवा ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द येथे नजीकच्या मासिक सभेत उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित पुर्वगणित रक्कम (जीएसटीसह) | इसारा रक्कम | निविदा किंमत | कामाचा कालावधी | निधीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चऱ्होली खुर्द येथे साईराम डेव्हलपर्स रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,९८,६१९/- | ९९८७/- | ५००/- | ६ महिने | ग्रामनिधी |
| २ | चऱ्होली खुर्द येथे गौरीनंदन सोसायटी बायपास रोड विलास थोरवे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | ९,९४,५५०/- | ९९४६/- | ५००/- | ६ महिने | ग्रामनिधी |
| ३ | चऱ्होली खुर्द येथे रोहिदास पगडे ते खंडोबा मंदिराला जोडणारा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ९,९८,६१९/- | ९९८७/- | ५००/- | ६ महिने | ग्रामनिधी |
| ४ | चऱ्होली खुर्द येथे सुरेश बबन पगडे ते बाबुलाल गायकवाड यांच्या घराकडे जाणारा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ४,५४,८७०/- | ४५४९/- | ५००/- | ६ महिने | ग्रामनिधी |
| ५ | चऱ्होली खुर्द येथे पगडेवस्ती ते जिल्हा परिषद शाळेकडे जाणारा रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | ४,५४,८७०/- | ४५४९/- | ५००/- | ६ महिने | ग्रामनिधी |

टिप-

१. कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा / कामे रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प.तीने राखून ठेवलेला आहे.
२. सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इत्यादीबाबतचा तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून निविदा उपलब्ध होतील.
३. ठेकेदारांचे कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखला सादर करणे आवश्यक आहे.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे.

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत चऱ्होली खुर्द, ता. खेड, जि. पुणे.

# नाविन्यपूर्ण शिक्षण हेच राष्ट्राच्या प्रगतीचे साधन - डॉ. अभय करंदीकर

- **एमआयटी एडीटी' विद्यापीठात 'विद्यारंभ-२५'ला प्रारंभ**




**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

एकविसाव्या शतकात शिक्षणाची परिभाषा पूर्णपणे बदलली आहे. शिक्षण आता केवळ विद्यापीठे, प्रयोगशाळा, पदवी घेण्यापर्यंत मर्यादित राहिले नसून ते राष्ट्राच्या प्रगतीचे एक साधन बनले आहे. त्यामुळे, विकसित भारत@२०४७ चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीसह इतर क्षेत्रात राष्ट्रासमोर असणाऱ्या समस्या सोडविण्यासाठीचे शिक्षण विद्यार्थ्यांना द्यायला हवे. धाडसी विचारांनीच भारत देश घडला असून, विद्यार्थ्यांनीही सर्वोत्तम देत आपल्या क्षेत्रात असणाऱ्या समस्यांना सोडविण्याचे धाडस दाखवावे, असे मत भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे (डीएसटी) सचिव प्रा. डॉ.अभय करंदीकर यांनी व्यक्त केले.

ते येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या १०व्या विद्यारंभ-२५ कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी, व्यासपीठावर, माईर्स एमआयटी शिक्षण समुहाचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ.विश्वनाथ दा. कराड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड, कुलगुरू प्रा.डॉ. राजेश एस., कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कार्यकारी संचालक डॉ.विनायक घैसास, प्र. कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे यांच्यासह विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक उपस्थित होते.

डॉ.करंदीकर पुढे म्हणाले, डॉ. अब्दुल कलाम यांनी म्हटल्याप्रमाणे, विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत. कारण, त्यातून येणारे अपयश देखील ऐतिहासिक असते. तसेच, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या १५०+ एकरांच्या सुसज्ज अशा या कॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांसाठी क्रेया, रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर यांसारखे अनेक नाविण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात, व त्यातून सध्या ७५+ संशोधन प्रकल्प चालू असल्याचे पाहून आनंद झाला.

विश्वशांती प्रार्थनेने सुरु झालेल्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश एस., यांनी तर आभार डॉ. दुबे यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा. श्रद्धा वाघटकर व डॉ. अशोक घुगे यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. ते म्हणाले, विद्यार्थी दशेत गुरे चारत असतानाच शहरात जावून मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे, विद्यार्थ्यांनी नक्कीच मोठी स्पप्ने पाहावीत, कारण ती एक दिवस नक्कीच पूर्ण होतात. अमेरिका भेटीत मला समजले की, संपूर्ण विश्वाचे लक्ष सध्या भारताकडे आहे. कारण, सध्या अशांतता, युद्धाचे सावट, उठाव यांच्यात गुरफटलेल्या विश्वाला सुख, शांती आणि समाधानाचा राजमार्ग दाखविण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृतीत आहे.

एआयसारख्या तंत्रज्ञानामुळे सध्या सर्व क्षेत्रामध्ये मोठी क्रांती घडत आहे. शिक्षण क्षेत्रातही याचा मोठा प्रभाव पडला आहे. विद्यार्थ्यांनीही या संसाधनाचा विधायक वापर करून बदलत्या जगासोबत राहिले पाहिजे. पारंपारिक शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर भर द्यायला हवा. त्यासाठी, नोकऱ्यांसाठी आवश्यक असणारी कौशल्य व नवउद्योजक घडवणारे शिक्षण देण्याची जबाबदारी आता विद्यापीठांची आहे. अगदी तसेच अभिप्रेत शिक्षण एमआयटी एडीटी विद्यापीठ पुरवित असून त्याचमुळे यंदा ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश घेत पुनश्च एमआयटी ब्रँड वर विश्वास दर्शविला असे प्रा. डॉ.मंगेश कराड यांनी सांगितले .



## थोडक्यात



### खेळाडूंच्या कारर्किदीत फिजिओथेरपिस्टचे अनन्यसाधारण महत्त्व : अभिनव बिंद्रा

पुणे (आरंभ पर्व) : फक्त शारीरिक स्वास्थासाठी नव्हे तर खेळाडूच्या मानसिक तंदुरूस्ती आणि एकंदर कल्याणामध्ये फिजिओथेरपिस्टची भूमिका ही मोलाची असते,असे प्रतिपादन नेमबाज व ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेता अभिनव बिंद्रा यांनी केले. संचेती हॉस्पिटल येथे अद्ययावत फिजिओथेरपी विभागाचे उद्घाटन अभिनव बिंद्रा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचेती हॉस्पिटलचे संस्थापक अध्यक्ष डॉ.के.एच.संचेती,बजाज ऑटोचे व्यवस्थापकीय संचालक राजीव बजाज, संचेती हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ.पराग संचेती, कार्यकारी संचालिका मनिषा संघवी, होम हेल्थकेअर व कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख रूपल संचेती आणि फिजिओ थेरपी विभागाच्या प्रमुख डॉ.दर्शिता नरवानी आदी मान्यवर उपस्थित होते. अभिनव बिंद्रा म्हणाले की,माझ्या दोन दशकांहून अधिक कार्रकिदीमध्ये दहा फिजिओथेरपीस्ट बरोबर मी काम केले. माझे त्यांच्याशी नाते विश्वासावर आधारित होते.खेळाडूंची कार्रकिद ही दीर्घकालीन आणि आव्हानात्मक असते,कारण आम्ही दररोज परिसीमा ओलांडण्याचा प्रयत्न करत असतो.

### आज शेतकरी हक्क परिषदेचे आयोजन

- बच्चू कडू, राजू शेट्टी, अजित नवले यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतीप्रश्नांवर होणार चर्चा

पुणे (आरंभ पर्व) : शेतकरी, शेतमजूर यांच्या प्रश्नांना वाचा फोडावी, शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी व शेतीमालाला योग्य हमीभाव मिळावा, या मागणीसाठी राज्यातील शेतकरी नेत्यांनी एकत्रित येत शेतकरी हक्क परिषदेचे पुण्यात आयोजन केले आहे. ही शेतकरी हक्क परिषद येत्या शुक्रवारी (ता. ८) रोजी सकाळी १०.३० वाजता नवी पेठेतील पत्रकार भवनात होणार आहे, अशी माहिती शेतकरी हक्क परिषदेचे संयोजक महेश बडे यांनी दिली. महेश बडे म्हणाले,"या परिषदेला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष व माजी राज्यमंत्री बच्चू कडू, शेतकरी नेते व अखिल भारतीय किसानसभेचे राष्ट्रीय सहसचिव अजित नवले, शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार कैलास पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट, ज्येष्ठ पत्रकार रमेश जाधव, शरद जोशी विचारमंचाचे अध्यक्ष विठ्ठलराजे पवार, स्वराज्य पक्ष शेतकरी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर, आम आदमी पार्टीचे उपाध्यक्ष विजय कुंभार, भारतीय किसान युनियनचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर नलावडे-पाटील, राष्ट्रीय समाज पक्षाचे सरचिटणीस अजित पाटील प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत."



### डी.पी. प्लॅन विरोधात राष्ट्रवादी कॉँग्रेसचं जनआक्रोश मोर्चा!

पिंपरी चिंचवड (आरंभ पर्व) : पिंपरी चिंचवड महापालिकेने विविध भागांमध्ये प्रस्तावित केलेल्या विकास आराखड्याविरोधात (डी.पी. प्लॅन) नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिकेवर "जन आक्रोश मोर्चा" काढण्यात आला. या मोर्चाला हजारोंच्या संख्येने नागरिकांनी प्रतिसाद दिला. या भव्य मोर्चाचे नेतृत्व महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. यावेळी भोसरीचे माजी आमदार विलासशेठ लांडे, शहराध्यक्ष योगेश बहल, महिला अध्यक्षा कविताताई आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, ज्येष्ठ नगरसेवक भाऊसाहेब भोईर, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, उद्योजक श्रीशेठ आसवाणी, नगरसेवक प्रशांत शितोळे, अजित गव्हाणे, श्याम लांडे, डब्बू आसवानी, संतोष कोकणे, विनोद नढे, मयूर कलाटे, राहुल भोसले, श्रीधरबापू वाल्हेकर, नगरसेविका उषाताई वाघेरे, माई काटे, ऊषामाई, अपर्णा डोके, प्रज्ञा खानोलकर, अश्विनी तापकीर, तसेच युवा नेते श्याम जगताप, तानाजी जवळकर, बाप्पू कातळे, सागर कोकणे, चंद्रकांत तापकीर, उमेश काटे, सचिन वाल्हेकर आणि आजी-माजी नगरसेवक, सेलचे पदाधिकारी, तसेच डी.पी. प्लॅनमुळे बाधित झालेले असंख्य नागरिक सहभागी झाले. "नागरिकांच्या जमिनी, घरे, व्यवसाय उध्वस्त करणारा डी.पी. प्लॅन आम्हाला मान्य नाही", असा स्पष्ट संदेश या मोर्चातून देण्यात आला. राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाने नागरिकांच्या भावना महापालिकेपर्यंत पोहोचवून, जनतेच्या विरोधाला आवाज देत डी.पी. आराखड्याच्या पुनर्विचाराची मागणी केली. आंदोलन शांततेत पार पडले, मात्र यामागे असलेला जनआक्रोश महापालिकेला निश्चितच विचार करायला भाग पाडेल, असे मत यावेळी उपस्थित नेत्यांनी व्यक्त केले.

# मोबाईलचा अतिवापर माणसाला अधोगतीकडे नेणारा

## कृत्रिम बुद्धिमतेमुळे माणसाची बौद्धिक क्षमता खालावतेय : अच्युत गोडबोले यांचे प्रतिपादन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"मोबाईल हे मूलतः संवादाचे माध्यम होते. मात्र, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे त्यातील संवाद हरपून अन्य गोष्टी मानवी मेंदूला वेडे करू पाहत आहेत. मोबाईलचा गरजेपुरता वापर केला, तर आपल्या जगण्याला पूरक असे साधन आहे. मात्र, त्याचा अतिवापर माणसाला अधोगतीकडे घेऊन जाणारा आहे. कृत्रिम बुद्धिमतेमुळे आपली विचार करण्याची क्षमता खुंटत असून, माणसाच्या बौद्धिक क्षमतेवर त्याचा विपरीत परिणाम होताना दिसत आहे," असे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक व वक्ते अच्युत गोडबोले यांनी केले.

विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व माजी विद्यार्थी नवनाथ जगताप लिखित, रुद्र प्रकाशनातर्फे प्रकाशित 'मोबाईल व्यसनमुक्ती' या पुस्तकाचे प्रकाशन अच्युत गोडबोले व ज्येष्ठ उद्योजक प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. समितीच्या सेनापती बापट रस्त्यावरील लजपतराय भवन विद्यार्थी संकुलात झालेल्या कार्यक्रमात समितीचे कायम विश्वस्त डॉ. भाऊसाहेब जाधव, सी. ई. पोतनीस, सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन, प्रदीप गारटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. जवळपास ५०० पेक्षा अधिक लोकांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.

अच्युत गोडबोले म्हणाले, "टीव्हीपाठोपाठ आलेल्या मोबाईल, इंटरनेट आणि स्मार्टफोनमुळे एक मोठा विस्फोट झाला आहे. ज्ञानवर्धनाचे साधन होण्याऐवजी त्याचे व्यसन लागून न्यूनगंड तयार होऊ लागला आहे. तुलनात्मक मानसिकतेमुळे नैराश्य येण्यासह आत्मविशास खालावत आहे. मानसिक आरोग्याच्या समस्या उद्भवत आहेत. सतत गुंतून राहिल्याने शारीरिक व्याधींनाही सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अतिवापर टाळा. स्वतःची विचार क्षमता विकसित करा. सोशल व इमोशनल इंटेलिजन्स, सांघिक भावना, श्रवणकला, वाचन यावर भर दिला पाहिजे. समितीमध्ये या सर्व गोष्टींवर भर दिला जातो, याचा आनंद आहे."

प्रतापराव पवार म्हणाले, "मोबाईलचा उपयुक्त वापर चांगला आहे. मात्र, सर्वकाही त्यावर अवलंबून असता कामा नये. स्वतःसाठी वेळ देता यावा. आपला प्राधान्यक्रम ठरवून वेळेचे योग्य नियोजन केले, तर तुमचे चारित्र्य अधिक संपन्न होण्यास मदत होईल. सबबी न सांगता केलेले कष्ट, जपलेला प्रामाणिकपणा आणि शिस्त आपल्याला यशाकडे घेऊन जाते. तुमचे चारित्र्य मोबाईल नव्हे, तर स्वतः तुम्ही घडवत असता. त्यामुळे स्वतःला समृद्ध करण्यासाठी इतर अनेक पर्यायांचा योग्य वापर करा."

यजुर्वेंद्र महाजन यांनी मोबाईलचा वापर अनेकांना फायद्याचा ठरतो, असे सांगत नात्यांमध्ये दुरावा निर्माण होण्याचे कारणही मोबाईलच असल्याचे सांगितले. तुषार रंजनकर यांनी मोबाईल, इंटरनेटच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्याची गरज अधोरेखित केली. मेंदूवर थेट परिणाम करणाऱ्या मोबाईलच्या व्यसनाला आपण गांभीर्याने घ्यायला हवे, असे नवनाथ जगताप यांनी नमूद केले.

## आंतरजातीय प्रेमविवाहातून मारहाण आणि अपहरण प्रकरणातील तिघांना अटक

- अपहरण झालेल्या विवाहीतेची सुटका

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

आंतरजातीय प्रेमविवाहातून मारहाण आणि अपहरण प्रकरणातील संशयीत तीन जणांना खेड पोलिसांनी अटक केली. खेड तालुक्यातील खरपुडी बुद्रुक -मांडवळा येथे रविवारी (दि.३) आश्रमात पतीला मारहाण आणि पत्नीचे अपहरण केल्याची घटना घडली होती. अपहरण करण्यात आलेल्या विवाहीतेची सुटका व तीच्या माहेरच्या संशयीतांना घटनेनंतर चोवीस तासात अटक करण्यात खेड पोलीसांना यश आले. संशयीतांना गुरुवार (दि. ७) पर्यंत तीन दिवसांची पोलिस कोठडी राजगुरुनगर न्यायालयाने दिली आहे. सुशीला राजाराम काशिद ( वय ५० ), अक्षय उर्फ गणेश राजाराम काशिद (वय ३०, दोघे रा. खरपुडी बुद्रुक, ता खेड ), योगीराज सुरेश करवंदे (वय २५, रा.पाबळ रस्ता, राजगुरुनगर ) अशी संशयीतांची नांवे आहेत. या घटनेबाबत पोलीसांनी माहिती दिली की, मांडवळा येथील आश्रमातील मंदिरात देवदर्शनासाठी अपहरण झालेली महिला येत असे. आश्रम चालक विश्वनाथ गोसावी यांची त्यांच्याशी मैत्री होऊन मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. त्यांनी ५ ऑगस्ट २०२४ रोजी आंतरजातीय विवाह केला होता. काही महिने आश्रम सोडून ते बाहेरगावी राहत होते. मुलीच्या आई, भावाकडून आंतरजातीय विवाह केला म्हणून या लग्नाला विरोध होता. विवाहीतेला आई, वडील, भाऊ पुन्हा घरी ये म्हणून सांगत होते. मात्र, तिने जाण्यास तिने नकार दिला होता. रविवारी (दि.३) दुपारी विवाहीतेच्या आई, भावासह माहेरच्या सुमारे वीस लोकांनी आश्रमातील घरी येऊन विवाहीतेला जबरदस्तीने घेऊन गेले. पती विश्वनाथ गोसावी याला तिच्या भाऊ व बरोबर आलेल्या इतरांनी मारहाण केली होती. खेड पोलिसांनी अपहरण झालेल्या विवाहीतेचा व संशयीत आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक केली आहे.

## पाणीपुरवठा आणि वीज व्यवस्था धोकादायक अवस्थेत

- ग्रामस्थांची तातडीने कारवाईची मागणी

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

हिंगणी (पा.) येथील हिंगणी मध्यम प्रकल्पाच्या (DAM) वैराग पाणीपुरवठा लाईनची अवस्था सध्या अतिशय बिकट झाली असून, अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाईप लाईन लिकेज झाल्याने पाण्याचा प्रचंड अपव्यय होत आहे. या गळतीमुळे परिसरात फिरणेही कठीण झाले असून, देवस्थानांकडे जाणाऱ्या मार्गावरही पाण्याचे साठे आणि चिखल यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ग्रामस्थ तुषार गव्हाणे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, "पाणीपुरवठा लाईन फक्त गळतीच नाही, तर शेतीसाठी नेणाऱ्या पाइपलाइनसुद्धा अनेक ठिकाणी गळत आहेत, याचा थेट फटका पिकांना आणि शेतकऱ्यांच्या मेहनतीला बसतो आहे." फक्त पाणीपुरवठाच नव्हे, तर हिंगणी परिसरातील वीज व्यवस्थाही गंभीर स्वरूपात धोकादायक बनली आहे. शेती व पाणीपुरवठ्यासाठी टाकण्यात आलेल्या केबल्स अनेक ठिकाणी उघड्यावर, झाडांवर लोंबकळत पडल्या असून, कोणत्याही क्षणी मोठा अपघात घडू शकतो. काही महिन्यांपूर्वी अशाच एका लोंबकळणाऱ्या केबलमुळे एका गायीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती, ज्याची माहिती MSEB सोलापूर विभागाकडे दिली गेली होती.



### ग्रामस्थांची तातडीने कारवाईची मागणी

**या दोन्ही गंभीर अडचणींवर तातडीने कारवाई करावी, पाईप लाईन आणि वीज केबल यांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अन्यथा नागरिकांचे आणि जनावरांचे जीव धोक्यात येऊ शकतात, अशी नम्र विनंती ग्रामस्थ तुषार गव्हाणे यांनी संबंधित विभागांना केली आहे.**

## दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळेला संगणक व प्रिंटर भेट

- शिक्षणात आधुनिकतेचा पूरक टक्का

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथील श्री स्वामी समर्थ सेवा संस्थान आणि शिववंदना मित्रपरिवाराच्या संयुक्त उपक्रमातून वेल्हे तालुक्यातील दुर्गम पासली गावातील जिल्हा परिषद शाळेला संगणक आणि कलर प्रिंटर भेट म्हणून देण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना अधिक सक्षम बनवण्याचा हा स्तुत्य उपक्रम मानला जात आहे.



या कार्यक्रमाचे उद्घाटन ट्रस्टचे कार्याध्यक्ष मिलिंद पोकळे यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमात संगणक व प्रिंटरचे दाते मंगेश देशमुख यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सामाजिक उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संयोजक चंद्रशेखर दादा पोकळे यांनी विशेष मेहनत घेतली.

कार्यक्रमास शाळेचे शिक्षक कापरे सर, पाटील सर, शिळीमकर सर, ट्रस्टचे पदाधिकारी तसेच व्यंकटसाई होंडाचे संतोष कदम, हर्षल टिळेकर, प्रणव इंदलकर, निलेश मानकर यांची उपस्थिती लाभली.

शिववंदना मित्रपरिवाराचे संस्थापक प्राज भिलारे म्हणाले, "गेल्या एक वर्षात ३ लाखांहून अधिक आर्थिक मदत गरजू शाळांना करण्यात आली असून, आजचा उपक्रम हा त्याच सामाजिक बांधिलकीचा भाग आहे."

या उपक्रमामुळे शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाशी नाते जोडण्याची संधी मिळणार असून, अशा प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळणार आहे.



## प्रा. योगेश हांडगे यांचा वाढदिवस साजरा

**कात्रज, पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रा. योगेश हांडगे यांचा वाढदिवस पुणे महानगरपालिकेच्या आंबेगाव बु.शाळेत समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले तसेच स्वलिखित करिअर मार्गदर्शक पुस्तकाचे मोफत वाटप करून विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित केले. कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका शिंदे मॅडम, विकास कंकाल सर, काकडे सर आणि इतर शिक्षकवृंद उपस्थित होते. उपस्थितांनी प्रा. हांडगे यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाचे कौतुक केले.

## चव्हाण यांना १० कोटींची मानहानीची नोटीस !

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नुकताच मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा निकाल लागला. त्यानंतर 'भगवा दहशतवादा'च्या काँग्रेसी षड्यंत्राचा बुरखा फाटला. त्यानंतर सारवासारव करतांना काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आधी 'भगवा दहशतवाद' म्हणू नका, तर 'सनातनी दहशतवाद' म्हणा, असे म्हणत सनातन धर्मावर पुन्हा टीका केली. त्याविषयी स्पष्टीकरण देतांना त्यांनी धर्माला नव्हे, तर मी सनातन संस्थेला 'आतंकवादी संघटना' म्हणाले, असे वक्तव्य केले. हे वक्तव्य खोटे, बिनबुडाचे आणि दिशाभूल करणारे असून या प्रकरणी सनातन संस्थेचे विश्वस्त श्री. वीरेंद्र मराठे यांच्या वतीने त्यांना १० कोटी रुपयांची मानहानीची नोटीस पाठवण्यात आली आहे. तसेच पृथ्वीराज चव्हाण यांनी सनातन संस्थेची बिनशर्त माफी मागावी अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, असा इशारा सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिला आहे. या नोटिसीमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी १५ दिवसांच्या आत लेखी माफी मागणे, मूळ मुलाखतीइतक्याच प्रसिद्धीने ती माफी प्रसिद्ध करणे, भविष्यात कोणतीही बदनामीकारक विधाने न करणे आणि १० हजार रुपये कायदेशीर खर्च भरपाई देणे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. संस्थेचे मानद कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता रामदास केसरकर यांनी नोटिशीत म्हटले आहे की, चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे सनातन संस्थेची प्रतीमा मलीन झाली असून हजारो साधकांच्या भावना दुखावल्या आहेत.

# बस चालकाकडुन सामान्य नागरिकाला धमकी

### लोणी काळभोर येथील घटना



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील स्टेशन चौकात (ता ०६ ऑगस्ट) रोजी सायंकाळी साडे आठ वाजण्याच्या दरम्यान पि एम पी एल बस चालकाने किरकोळ कारणावरून एका कारचालकाला अरेरावी ,शिवीगाळ करत पोर बोलवुन तुला मारेन अशी धमकी दिली असल्याची घटना समोर आली आहे. ज्ञानेश्वर भोसले हे त्यांची नवीन कार पुणे सोलापूर महामार्गावरून उरुळी कांचनला घरी जात असताना लोणी काळभोर स्टेशन चौकात आल्यावर पी एम पी एल बस क्र. (एम एच- १२ -एक्स एम, ८५२१) बस कोड नं , (तिरुपती ६२) या बसचा चालक तानाजी शिंदे (वय ३० वर्ष रा. लोणी काळभोर पुणे.) याने विनाकारण हॉर्न वाजवत बस दोन वेळा अंगावर घालण्याचा प्रयत्न केला असुन भोसले यांनी बस चालकाला विचारणा केली असताना बस चालकाने अरेरावी करत शिवीगाळ करून, तुला शंभरच्या स्पीडने गाडी चालवता येत नाही का असे उलट सुलट बोलुन भोसले यांना पोर बोलून मारीन असे बस चालकाने धमकी दिली असल्याचे भोसले यांनी सांगितले.

**अशा काही मुजोर बस चालकांकडून रस्त्यावर नागरिकांना विनाकारण त्रास होतो. पोर बोलून मारहाण करेन बोलणे बस चालकाचे बोलणे योग्य नाही. बस चालकांकडून नागरिकांना अरेरावी, दमदाटी करणे अशा घटना सतत घडत आहेत अशा मुजोर बस चालकांवर संबंधित बस अधिकारी यांनी कारवाई करावी.**

**- सतीश साळवी - वंचित बहुजन आघाडी पुणे जिल्हा महासचिव**

**आमच्याकडून त्या बस चालकावर योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी घटना पुन्हा होणार नाही याची दक्षता आमच्याकडून घेण्यात येईल, बस चालकांच्या विरोधात अशी काही तक्रार असल्यास नागरिकांनी ऑफिसशी संपर्क साधावा. तसा कोणी आढळल्यास मुजोर पणा करणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात येईल**

**- समीर आत्तार - पि एम पि एल, अधिकारी हडपसर डेपो.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.



# "नागेशशेठ चव्हाण यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माथाडी कामगार , वाहतूक विभाग प्रदेश अध्यक्ष आणि सोलापूर जिल्हा रहिवासी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नागेश शेठ चव्हाण यांचा वाढदिवस पुण्यातील त्यांच्या कार्यालयात उत्साही, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा झाला. साधेपणाचा संकल्प असूनही कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक प्रेम, शुभेच्छांचा ओघ आणि नेत्यांप्रती असलेली जिव्हाळ्याची भावना यामुळे वाढदिवस एक उत्सवात रूपांतरित झाला.

या विशेष प्रसंगी बार्शी तालुका, सोलापूर जिल्हा, पुणे शहर अशा तीनही ठिकाणांहून कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून नागेश शेठ चव्हाण यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राज्य सरकारपासून ते स्थानिक नेतृत्वापर्यंत अनेक मान्यवरांनी त्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री. नागेश चव्हाण हे मूळचे जवळगाव, ता. बार्शी येथील असून, गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय व कामगार क्षेत्रात अत्यंत सक्रिय आहेत. माथाडी कामगारांच्या हक्कांसाठी त्यांनी रस्त्यावर उतरून लढा दिला असून, रहिवासी संघटनेच्या माध्यमातून नागरी समस्यांकडे शासनाचं लक्ष वेधण्याचं मोठं काम त्यांनी केलं आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक समस्यांवर तोडगा निघाल्याने कार्यकर्त्यांमध्ये आणि जनसामान्यांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर आणि विश्वास निर्माण झाला आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने राज्याचे कृषी मंत्री मा. दत्तामामा भरणे, खा. ओमराजे निंबाळकर, आ. दिलीप सोपल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील,

- **कार्यकर्त्यांच्या प्रेमाने आणि लोकनेतेपदाच्या वलयाने सजलेला वाढदिवस!**

उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, वाहतूक विभागाचे उपाध्यक्ष दत्ता वाळके, अभिषेक आल्हाट, नवाज मुलाणी, शिरीष ताटे, ॲड .सुप्रिया गुंड पाटील, सुनील जाधव, बापू वाघमारे, संदीप जाधव, पवन, अजिंक्य गायकवाड, रिया शेख, अनिल सोनार आदी मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. याशिवाय सोशल मीडियावरही शुभेच्छांचा अक्षरशः पूर आला. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामवर कार्यकर्त्यांनी त्यांच्या आठवणी, कार्याचे फोटो, व्हिडीओ पोस्ट करत आपल्या भावना व्यक्त केल्या. वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित सत्कार समारंभात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील म्हणाले –

"नागेश शेठ चव्हाण हे केवळ कामगार नेते नाहीत, तर एक प्रभावी संघटक आहेत. त्यांच्या कार्यशैलीमुळे पक्षाचा आधारस्तंभ ठरलेल्या कार्यकर्त्यांशी त्यांचा उत्तम संवाद आहे. त्यामुळेच आगामी काळात त्यांना सोलापूर जिल्ह्यातील महत्त्वाची जबाबदारी दिली जाणार आहे."

आपल्या वाढदिवशी दिलखुलास आणि नम्र शब्दात प्रतिक्रिया देताना नागेश चव्हाण म्हणाले –

"मी आजवर जनतेसाठी, कामगारांसाठी, रहिवाशांसाठी कार्य करत आलो आहे. भविष्यातही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली बार्शी तालुक्यासह सोलापूर जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मी अहोरात्र प्रयत्नशील राहणार आहे. मला शुभेच्छा देणाऱ्या सर्व मित्रपरिवाराचे, मान्यवरांचे आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार."

## कार्यकर्त्यांचा नेता – समाजमनातील उमेद

**श्री. नागेश शेठ चव्हाण यांचा वाढदिवस केवळ एक वैयक्तिक साजरा होणारा दिवस नव्हता, तर कार्यकर्त्यांमधून उभं राहत असलेलं एक प्रभावी नेतृत्व जनतेच्या मनात ठसा उमटवत आहे, याची प्रचिती देणारा दिवस होता.**

# गुणवंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

ओंकार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ, करिअर मार्गदर्शन शिबिर आणि शिष्यवृत्ती प्रदान सोहळा काल मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे आणि एअरमार्शल श्री. भूषण गोखले यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते, परंतु काही कारणास्तव त्यांचे आगमन रद्द झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी भाषा मंडळाचे संचालक आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. केशव देशमुख सर यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी उपस्थिती दर्शवली तर सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. वि. दा. पिंगळे सर, क्रिकेट खेळाचे प्रशिक्षक श्री. श्याम ओक सर, माजी नगरसेविका सौ लक्ष्मी दुधाने यांच्या प्रमुख





उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यावेळी ओंकार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने इयत्ता बारावीच्या ओजस देशपांडे, तेजल गव्हाणे, सार्थक भास्कर, हर्षदा शेलार आणि ऋतुजा भांडवलकर या पाच विद्यार्थ्यांना तर इयत्ता दहावीच्या गुरुराज धोंगडे, सई धडपळे, मिहीर आपटे, आदर्श सातपुते आणि भार्गव मराठे या पाच विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि आर्थिक शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. याप्रसंगी तब्बल पाचशे ते साडेपाचशे विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह उपस्थिती दर्शवली असून आपल्या प्रभागातील पलक निलेश वरपे या महाराष्ट्र राज्याकडून क्रिकेट खेळणाऱ्या विद्यार्थिनीने इयत्ता दहावीच्या परीक्षेत ८३% गुण प्राप्त केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. अभ्यासासह आपला छंद जोपासत खेळाला प्राधान्य दिले आणि पलकने उत्तम गुण प्राप्त केले असून तिच्या या मेहनतीत तिच्या पालकांनीही साथ दिल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करत सत्कार केला.

यावेळी मार्गदर्शन करताना पुस्तकांचे महत्व, अभ्यासाबद्दल दृष्टिकोन आणि गेल्या १४ वर्षांत ओंकार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने करण्यात आलेले कार्य आदी गोष्टींवर प्रकाश टाकण्यात आला. समाजात वावरत असताना आपण समाजासाठी काही देणे लागतो, असे प्रतिपादन करताना सहकाऱ्यांचे आभार मानले. यावेळी माझे सहकारी श्री. प्रमोदजी शिंदे, दीपकजी चांदकुडे, श्री. किशोरजी शेडगे, श्री. विष्णूजी सरगर, श्री. विनायकजी देशमुख तर सूत्रसंचालक रत्नाताई दहीवळकर तसेच ओंकार चॅरिटेबल ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित प्रत्येक विद्यार्थ्याला ॲडव्हान्स डॉक्युमेंट फोल्डर प्रदान करण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद अवर्णनीय होता.

**आपल्या समाजातील विद्यार्थी वर्गाला यथायोग्य मार्गदर्शन लाभणे आवश्यक असून याबाबत शिबिराचे आयोजन केल्याने पालक आणि विद्यार्थी वर्गातून समाधान व्यक्त केले जात आहे. त्यांचे हे शब्द हीच आमच्या परिश्रमांची पोहोच पावती असून भविष्यातही असेच अधिकाधिक उपक्रम राबवण्याचा आमचा मानस असेल.**

**श्री स्वप्निल लक्ष्मी देवराम दुधाने**
**सचिव- ओंकार चॅरिटेबल ट्रस्ट**
**अध्यक्ष - कोथरूड विधानसभा मतदारसंघ**
**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्ष**



## ‘श्री पेंट्स’ आ. भीमराव तापकीर यांच्या हस्ते भव्य उद्घाटन संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आ .भीमराव तापकीर यांच्या हस्ते नवले ब्रिज येथे ‘श्री पेंट्स’ या नवनिर्मित दुकानाचे उद्घाटन उत्साहात पार पडले.

या वेळी श्री पेंट्सचे मालक सुशांत वाडेकर आणि सुभाष वाडेकर यांना त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीसाठी आमदार तापकीर यांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या उद्घाटन सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे खडकवासला विधानसभा अध्यक्ष काकासाहेब चव्हाण, पुणे डीसीसी बँकेचे संचालक मा. विकासनाना दांगट, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष श्री. विशाल उभे, तसेच श्री ग्रुपचे पदाधिकारी आदींचा समावेश होता.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या राख्यांनी हरिभाऊ चरवड निशब्द!!

## वडगाव बुद्रुकमध्ये अनोखी राखी

**वडगाव बुद्रुक (दै. आरंभ पर्व)**

स्वच्छतेसाठी अहोरात्र झटणाऱ्या महिला स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान करताना भावनांचा पूर आवरला गेला नाही. रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त वडगाव बुद्रुक येथील स्वच्छता विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी माजी नगरसेवक हरिदास चरवड यांना राखी बांधत भाऊ म्हणून आपली भावनिक नाळ जोडली.

यावेळी हरिदास चरवड यांनी सादर केलेली हृदयस्पर्शी कविता –

***“माणसांच्या गर्दीत हरवून***
***बसला माझा भाऊ,***
***सांग ना दादा, तुला भेटायला***
***कोणत्या पत्यावर येऊ...”***

ही उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू आणणारी ठरली. भाऊ-बहिणीच्या नात्यातील जिव्हाळा, माया आणि एकाकीपणाचे हळवे भाव त्यांनी शब्दांतून व्यक्त केले.

कार्यक्रमात बोलताना चरवड म्हणाले, "मी तुमचा मोठा भाऊ आहे. तुम्ही शहरासाठी करत असलेल्या सेवेसाठी मी कायम तुमच्या पाठीशी राहीन."

या कार्यक्रमाला रा.स्व. संघाचे हेमंत गद्रे, जयंत तारगुंडे, रामभाऊ काळे, स्वामी आवटे, संदीप चरवड, भाजप युवा मोर्चा सारंग नवले, वैशाली जाधव, तसेच सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे आरोग्य निरीक्षक विनय थोपटे, मोकादम अशोक साठे, केदार जाधव, आकाश लोणारे, साईप्रसाद मोरे, दिग्विजय चरवड , नंदकिशोर गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन साईप्रसाद मोरे यांनी केले तर विश्वजीत चरवड यांनी मनःपूर्वक आभार मानले. स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत साजरा झालेला हा अनोखा रक्षाबंधन सोहळा केवळ एक सण न राहता मानवी संवेदना, सन्मान आणि नात्यांचे प्रतीक ठरला.



# "सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी थेट संवाद...

## अमित शाह यांची भाजप कार्यसंस्कृतीची प्रचिती

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय जनता पक्षाची खरी ओळख म्हणजे कार्यकर्त्यांना दिला जाणारा मान आणि संवादाची खुली दारे. हेच जिवंत उदाहरण घडले जेव्हा केंद्रीय नागरी हवाई राज्यमंत्री मा. मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकारातून पुण्यातील भाजप मंडलाध्यक्षांना दिल्ली दौऱ्यावर नेण्यात आले आणि त्यांना देशाचे गृहमंत्री व सहकार मंत्री मा. अमित शाह यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी मिळाली.

संसद अधिवेशन सुरू असताना देखील मा. अमितभाईंनी वेळ काढत कार्यकर्त्यांशी संवाद साधला, त्यांचे प्रश्न ऐकले, आणि संघटनात्मक कार्याची सविस्तर माहिती घेतली. स्थानिक पातळीवरील समस्यांपासून ते पक्षवाढीपर्यंत विविध मुद्द्यांवर त्यांनी मंडलाध्यक्षांशी मनमोकळा संवाद केला.

या दौऱ्यात खडकवासला पश्चिम अध्यक्ष गणेश वरपे, यशवंत लायगुडे ,निलेश कोढाळकर कुलदीप



सावळेकर,लहू बालवडकर ,शाम काची,आंनद छाजड यांच्यासह विविध मंडलाध्यक्षांनी संसदेच्या कामकाजाचा थेट अनुभव घेतला. हे केवळ एक औपचारिक दौरे न राहता, एक प्रेरणादायी व अनुभवसमृद्ध प्रवास ठरला. भाजप ही संघटना केवळ राजकारणापुरती मर्यादित न राहता, ती मूल्यांवर चालणारी, कार्यकर्त्यांना केंद्रस्थानी मानणारी व्यवस्था आहे, हे या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले अशी भावना यावेळी केंद्रीय नागरी हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली..

“मंडल पातळीवरील कार्यकर्त्यांनाही पक्षाच्या सर्वोच्च नेतृत्वाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळते, ही भाजपच्या कार्यसंस्कृतीची मोठी जमेची बाजू आहे, आज भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता असल्याचा अभिमान नक्कीच वाटत आहे” असे मत खडकवासला उत्तर मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी व्यक्त केले.

# पी. के. चौकात होणार ग्रेड सेपरेटर !

## नाना काटे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी चिंचवड (दै. आरंभ पर्व)**

नाशिक फाटा ते वाकड मार्गावरील अत्यंत महत्त्वाच्या पी.के. चौकातील वाहतूक कोंडीचा अखेर कायमचा बंदोबस्त होणार आहे. या चौकात ग्रेड सेपरेटर (VUP अंडरपास पुल) साकारण्यात येणार असून, यामुळे नागरिकांना रोजच्या वाहतूक कोंडीपासून मोठा दिलासा मिळणार आहे. या चौकातील वाढत्या ट्रॅफिक समस्येच्या पार्श्वभूमीवर, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी 2 जानेवारी 2025 रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे विशेष निवेदन सादर करून ग्रेड सेपरेटरची मागणी केली होती. या मागणीचा पाठपुरावा सातत्याने करण्यात आला आणि अखेर आयुक्तांनी या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. हिंजवडी आयटी पार्क, सातारा हायवे, वाकड, तसेच पिंपरी-चिंचवड औद्योगिक वसाहती आणि चाकण-भोसरी मार्गांवर दररोज हजारो वाहनांची ये-जा असते. या मार्गावर असलेला पी.के. चौक हा पिंपळे सौदागर आणि रहाटणी



- **सादर केलेल्या निवेदनाची दखल; ट्रॅफिक कोंडी दूर होण्याचा मार्ग मोकळा**

भागाला जोडणारे मुख्य जंक्शन आहे. त्यामुळे येथे दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण होत होता. ग्रेड सेपरेटर उभारणीच्या निर्णयामुळे या भागातील नागरिक, विद्यार्थ्यांपासून ते कामगार वर्गापर्यंत सर्वांनाच दिलासा मिळणार आहे. वाहतूक कोंडीमुळे वेळेचा अपव्यय आणि मानसिक तणाव झेलणाऱ्या नागरिकांना आता सुरळीत आणि सुरक्षित प्रवास करता येणार आहे.




# काटेपुरम चौक परिसरात पार्किंगमुळे वाहतूक कोंडीचा त्रास

**सांगवी (दै. आरंभ पर्व)**

सांगवी विभागातील काटेपुरम चौक आणि परिसरात अवैध पार्किंगच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केले आहे. या भागातील नागरिक आणि स्थानिक दुकानदारांनी प्रशासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत P1 आणि P2 पार्किंग नियमांची तात्काळ अंमलबजावणी करण्याची जोरदार मागणी केली आहे. काटेपुरम चौक हा सांगवी विभागातील एक महत्त्वाचा आणि गजबजलेला परिसर आहे. येथे व्यापारी वसाहत, स्वीमिंग पूल, बॅडमिंटन हॉल यांसारख्या सुविधा असल्यामुळे दिवसभर लोकांची वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या दुतर्फा बेकायदेशीररित्या उभ्या केलेल्या वाहनांमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे की, या समस्येवर तातडीने लक्ष देण्यात यावे, वाहनांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि काटेकोरपणे P1 व P2

- **नागरिकांनी P1-P2 नियमांच्या अंमलबजावणीची केली मागणी**

नियम लागू करण्यात यावेत. या वेळी विजय यादव, भरत जैन, गौरव करणावट, डॉ. सुरज बांगर, डॉ. रोहन विश्वासराव, सतीश गुगळे, सतेज माने, सिद्धांत महाजन, जगदीश चौधरी, मिश्रीमा गेहलोत तसेच सर्व व्यापारी उपस्थित होते. "वाहतूक पोलीस आणि महापालिकेने संयुक्तपणे या परिसराची पाहणी करून अतिक्रमण आणि बेकायदेशीर पार्किंगवर कारवाई केली पाहिजे," अशी मागणी या वेळी नागरिकांनी केली. सांगवी विभागासाठी ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी वेळ न दवडता ठोस कारवाई करणे गरजेचे बनले आहे, अन्यथा नागरिकांचे संयम सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# खेवलकरांच्या मोबाईलमध्ये नग्न फोटो अन् मुलींचे घाणेरडे विवस्त्र व्हिडीओ

## रुपाली चाकणकरांचे गंभीर आरोप

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्याविरोधात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. पुणे पोलिसांकडून जप्त करण्यात आलेल्या खेवलकर यांच्या मोबाईलमधील ‘हिडन फोल्डर’मध्ये २५२ नग्न व्हिडिओ आणि १४९७ अश्लील फोटो आढळल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषदेत गंभीर आरोप केले असून मानवी तस्करीचं मोठं रॅकेट उघड होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

पुणे पोलिसांनी सानवी संस्थेच्या अहवालाच्या आधारे खेवलकर आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांना अटक केली होती. हडपसरमधील घरी छापा टाकून १० मोबाईल, कोकेन, गांजा आणि हुक्का पॉट जप्त करण्यात आले होते. यातील एका मोबाईलमध्ये ‘आरुष’ नावाने सेव्ह केलेल्या क्रमांकात हे अश्लील व्हिडीओ आणि फोटो आढळले.

चाकणकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गोवा, लोणावळा, जळगाव, साकिनाका अशा ठिकाणी काही तरुणींना चित्रपटात काम मिळवून देण्याचं आमिष दाखवून बोलावण्यात आलं.



त्या तरुणींवर लैंगिक अत्याचार झाले असून त्यांचा अश्लील व्हिडीओ नशेच्या अवस्थेत काढण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला.

चाकणकर म्हणाल्या की, या मुलींना फसवण्यासाठी ‘आरुष’ नावाचा माणूस ठेवण्यात आला होता. हे संपूर्ण प्रकरण केवळ रेव्ह पार्टीपुरतं मर्यादित नसून, त्यामागे व्यवस्थित नियोजित मानवी तस्करीचं जाळं असल्याचं संकेत मिळत आहेत. खेवलकर यांची २८ वेळा रूम बूक केल्याची नोंदही समोर आली आहे. हिडन फोल्डरमध्ये काही मोलकरणींचेही व्हिडीओ आढळले आहेत. हे प्रकरण केवळ स्त्रियांवरील अत्याचारापुरतं मर्यादित नसून, महिलांचा संगनमताने गैरवापर आणि आर्थिक परिस्थिती बिकट असलेल्या मुलींचा फायदा घेणं, हे केंद्रस्थानी असल्याचं चाकणकर यांनी स्पष्ट केलं. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी SIT (विशेष तपास पथक) स्थापन करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणात काही पीडित महिलांनी तक्रारी दाखल केल्या असून, अजूनही अनेक तरुणींनी पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असं आवाहन चाकणकर यांनी केलं आहे. हे प्रकरण गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असल्याची आणि अनेक आरोपी एकमेकांच्या संपर्कात असल्याची माहितीही त्यांनी दिली.